**ठळक बातम्या**

- शेती उपकरणांशी संबधित वस्तू आणि सेवा करामधल्या सुधारणांचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणं गरजेचं असल्याचं केंद्रीय कृषी मंत्र्यांचं प्रतिपादन

- राज्यातल्या १०९ शिक्षकांना गुणगौरव पुरस्कार

- हैदराबाद गॅझेटियरबाबतच्या शासन निर्णयामुळे ओबीसी समाजात अस्वस्थता वाढत असून युती सरकारमधल्या मंत्र्यांनी एकवाक्यता ठेवावी अशी काँग्रेसची मागणी

- केंद्र सरकार पुरस्कृत सर्व योजनांचं लेखापरीक्षण येत्या १ नोव्हेंबरपासून एकाच यंत्रणेमार्फत होणार

- जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत अंतिम पंघलला  कांस्यपदक

**आणि**

- चीन मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत पी. व्ही. सिंधू पराभूत

**<><><><>**

कृषीवापरासाठीच्या उपकरणांशी संबधित वस्तू आणि सेवा करामधल्या सुधारणांचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणं गरजेचं आहे असं केंद्रीय कृषीमंत्री शिवराज चौहान यांनी म्हटलं आहे.   यामुळे  शेतकऱ्यांच्या उत्पन्नात मोठा फरक पडेल, असं ते म्हणाले. शेतीसाठी वापरण्यात येणाऱ्या यंत्रांवरचा कर १२ ते १८ टक्क्यांवरुन ५ टक्क्यांवर आणण्यात आला आहे.  शेतीसाठीची उपकरणं स्वस्त झाल्यामुळे शेतकऱ्यांवरचा खर्चाचा भार कमी होईल तसंच यांत्रिक शेतीला चालना मिळेल असं चौहान यांनी सांगितलं. या सुधारणेचा फायदा शेतकऱ्यांपर्यंत पोचवण्याबाबत नवी दिल्ली इथं चौहान यांनी एक बैठक घेतली. या बैठकीनंतर ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

…. **होल्ड - बाईट- शिवराजसिंग चौहान- -**

**<><><><>**

जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवा कर परिषदेने नुकतीच जीएसटी कररचनेत सुधारणा केली. हे नवीन दर येत्या २२ तारखेपासून लागू होणार आहेत. विविध क्षेत्रांप्रमाणे ऑटोमोबाईल क्षेत्रातही करांच्या दरात कपात करण्यात आली आहे. सर्वसामान्यांना वाहतुकीसाठी उपयुक्त ठरणाऱ्या दुचाकी आणि लहान चारचाकी गाड्यांवरचा जीएसटी आता २८ टक्क्यांवरून १८ टक्के करण्यात आला आहे. याचा फायदा निम्न मध्यवर्गीय कुटुंब, तरुण व्यावसायिक आणि गिग कामगारांना होणार आहे. छोट्या चारचाकींवरच्या जीएसटीमध्येही कपात करण्यात आल्याने मध्यमवर्गीयांसाठी गाड्या आता अधिक परवडणाऱ्या दरात मिळणार आहेत.

**<><><><>**

सेवा आणि सुशासनाच्या मार्गावरून चालताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार देशाच्या सर्व समावेशक प्रगतीसाठी प्रयत्नशील आहे. देशातल्या आदिवासी समुदायांच्या सक्षमीकरणासाठी केंद्र सरकारने उपक्रम राबवून त्यांचं जीवनमान उंचावलं आहे. अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

**होल्ड... व्हॉईस कास्ट**

*(भारत हा जगातला सर्वात वैविध्यपूर्ण देश आहे. यात १० कोटी ४५ लाखांपेक्षा जास्त आदिवासींचा समावेश आहे. या आदिवासी समुदायांच्या जीवनमानात चांगले बदल घडवून आणण्यासाठी केंद्र सरकारने गेल्या दशकभरात विविध योजना राबवल्या आहेत. आदिवासी व्यवहार मंत्रालयासाठीचा निधी तिप्पट करून तो १३ हजार कोटी रुपयांपर्यंत वाढवला आहे. अनुसूचित जमातींसाठीचा विकास कृती निधीही पाच पटींनी वाढवण्यात आला आहे. प्रधानमंत्री जन जातीय आदिवासी न्याय अभियानामुळे ११ राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या ७५ आदिवासी समुदायांचं जीवन बदलत असून त्याचा फायदा ४७ लाखांहून अधिक आदिवासींना होत आहे. धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियानात १७ मंत्रालयांनी राबवलेल्या २५ उपक्रमांचा समावेश आहे. या योजनेचा उद्देश ६३ हजारांहून अधिक गावांमधल्या पायाभूत सुविधांची कमतरता भरून काढणं, आरोग्य आणि शिक्षण सुविधांची उपलब्धता सुधारणं आणि सुमारे ५ कोटी आदिवासींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणं हा आहे.)*

<><><><>

राज्यातल्या १०९ शिक्षकांना गुणगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. शिक्षक दिनानिमित्त अध्यापनात विशेष कामगिरी करणऱ्या शिक्षकांना दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो. यंदा ३८ प्राथमिक शिक्षक, ३९ माध्यमिक शिक्षक, आदिवासी विभागातून १९ प्राथमिक शिक्षक, सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कारासाठी ८ शिक्षिकांची निवड झाली आहे. कला आणि क्रीडा विषयांसाठी दोन आणि स्काऊट गाईडसाठी दोन शिक्षकांना तर दिव्यांग शिक्षक विभागात एक पुरस्कार मिळणार आहे.

येत्या २२ सप्टेंबर रोजी मुंबईमध्ये या राज्यशिक्षक पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे.

<><><><>

लहान मुलं, किशोरवयीन मुली आणि गरोदर मातांचं पोषण सुधारण्यासाठी सरकारने मिशन सक्षम अंगणवाडी आणि पोषण २.० हे दोन उपक्रम हाती घेतले आहेत, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. केंद्रीय मंत्री अन्नपूर्णादेवी यांचा लेख सामायिक करत मोदी म्हणाले की, या योजनांच्या माध्यमातून देशभर विस्तारलेल्या अंगणवाडी केंद्रांच्या जाळ्याद्वारे लाखो लाभार्थ्यांना मदत मिळत असून या योजना देशातल्या लाखो मुलांचं भविष्य घडवत आहेत, असं मोदी आपल्या संदेशात म्हणाले आहेत.

<><><><>

हैदराबाद गॅझेटियरबाबतच्या शासन निर्णयामुळे ओबीसी समाजात अस्वस्थता वाढत असल्याचा आरोप काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. या प्रश्नावर सरकारने बैठक बोलवावी, ओबीसी आरक्षणाला धक्का लागला आहे याचे पुरावे आम्ही देऊ, असं त्यांनी सांगितलं. ओबीसी उपसमितीचे सदस्य असलेले ज्येष्ठ मंत्री छगन भुजबळ आणि पंकजा मुंडे बाहेर एक भूमिका मांडत आहे तीच भूमिका त्यांनी बैठकीत मांडावी, असंही वडेट्टीवार यावेळी म्हणाले.

<><><><>

सर्व केंद्र पुरस्कृत योजनांचं लेखापरीक्षण येत्या १ नोव्हेंबरपासून एकाच यंत्रणेच्या माध्यमातून करण्यात येणार आहे, केंद्रीय विनियोजन विभागाचे सचिव वुमलुनमांग

वुअलनाम यांनी आज ही माहिती दिली. नवी दिल्ली इथे आयोजित राज्य वित्त सचिवांच्या दुसऱ्या वार्षिक परिषदेला ते संबोधित करत होते. याच परिषदेत लेखापरीक्षणाची गुणवत्ता वाढवण्यासाठी आणि त्यासाठी लागणारा वेळ वाचवण्यासाठी सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापनत डिजिटायझेशन करण्याची गरज भारताचे नियंत्रक आणि महालेखा परीक्षक संजय मूर्ती यांनी व्यक्त केली. डिजिटल प्लॅटफॉर्म आणि रिमोट ऑडिट यांचा वापर, राज्य सरकारच्या मालकीच्या उद्योगांचं तसंच स्वायत्त संस्थांचं लेखापरीक्षण अशा विविध विषयांवर त्यांनी आज मार्गदर्शन केलं. यावेळी कॅगने २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठीच्या राज्यांसाठीच्या वित्तविषयक अहवालाचं प्रकाशनही केलं.

**<><><><>**

भारताची कुस्तीपटू अंतिम पंघल हिनं जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत कांस्यपदक पटकावून भारताचं पदकांचं खातं उघडलं. महिलांच्या ५३ किलो वजनी गटात तिनं स्विडनच्या प्रतिस्पर्ध्याचा ९-१ असा पराभव केला. या स्पर्धेतलं तिचं हे दुसरं पदक आहे आणि ही कामगिरी करणारी ती दुसरी भारतीय महिला कुस्तीपटू आहे.

**<><><><>**

चीन मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत आज झालेल्या उपांत्यपूर्व फेरीत भारताच्या पी. व्ही. सिंधू हिला दक्षिण कोरियाच्या अन से यंग हिच्याकडून पराभव पत्करावा लागला. अन से यंगकडून १४-२१, १३-२१ असा सरळ गेममध्ये पराभव झाल्याने सिंधू या स्पर्धेतून बाहेर पडली आहे.

**<><><><>**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेच्या सर्व लाभार्थी महिलांना केवायसी प्रकिया सुलभपणे पुर्ण करण्यासाठी ई-केवायसी सुविधा देण्यात आली आहे. या योजनेतून लाभ मिळालेल्या महिलांनी दोन महिन्याच्या आत केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी असं आवाहन राज्याच्या महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केलं आहे. ladakibahin.maharashtra.gov.in या पोर्टलवर ई-केवायसी सुविधा दिली आहे. योजनेतली पारदर्शकता कायम रहावी आणि पात्र लाभार्थ्यांना नियमित लाभ मिळावा यासाठी ही प्रक्रिया पूर्ण करावी असं तटकरे यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><>**

श्री तुळजाभवानी शारदीय नवरात्र महोत्सवासाठी आरोग्य विभाग सज्ज झाला असून, भाविकांच्या सोयीसाठी अनेक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. तुळजापूरकडे येणाऱ्या प्रत्येक मार्गावर २२ आरोग्य पथकं कार्यान्वित करण्यात आली असून, तुळजापूर शहरात १३ प्रथमोपचार केंद्र सुरु करण्यात आली आहेत. यात्रा मार्गावर आणि शहरात प्रत्येकी १० साथरोग प्रतिबंधात्मक पथकं असतील, याद्वारे यात्रा मार्गावरच्या आणि शहरातल्या सर्व पाणी स्त्रोतांची, तसंच हॉटेल, ढाबे, लॉज आदी ठिकाणची पाणी तपासणी आणि शुद्धीकरण करण्यात येणार आहे. याशिवाय रुग्णवाहिका, आयसीयू सेंटर, आरोग्य दूत, आदी सुविधा देखील उपलब्ध करुन देण्यात आल्या असल्याचं, आरोग्य विभागानं कळवलं आहे.

**<><><>**

मुंबई उच्च न्यायालयाला आज पुन्हा एकदा बॉम्बस्फोटाची धमकी देणारा ई-मेल आला. पोलिसांनी संपूर्ण परिसरात कसून शोध घेतला, मात्र काहीही संशयास्पद आढळून आलं नाही. काही दिवसांपूर्वीही अशीच धमकी मिळाली होती, मात्र तेव्हाही कोणतीही संशयास्पद वस्तू सापडली नव्हती.

**<><><>**

कौशल्य विकास विभागानं मुंबईत आयोजित केलेल्या ‘क्षमता विकास आणि जनजगृती’ कार्यशाळेचं केंद्रीय कौशल्य विकास आणि नवउद्योजकता मंत्री जयंत चौधरी यांनी आज दूरस्थ पद्धतीनं उदघाटन केलं. या कार्यक्रमाला राज्याचे कौशल्य विकासमंत्री मंगल प्रभात लोढा उपस्थित होते. कौशल्य विकास ही देशाच्या प्रगतीची किल्ली आहे, असं मत लोढा यांनी यावेळी व्यक्त केलं. कौशल्य विकासासाठी तयार करण्यात आलेल्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य आणि केंद्र सरकारमध्ये सुसंवाद आणि समन्वय असणं  ही काळाची गरज आहे, असंही ते म्हणाले. या कार्यशाळेत  ६ राज्यांचे प्रतिनिधी सहभागी झाले आहेत.

**<><><>**

राज्याच्या बहुतांश भागात पाऊस ओसरला असला, तरी काही भागांत मात्र अजून पावसाचा जोर कायम आहे.

हिंगोली जिल्ह्यातल्या कळमनुरी तालुक्यांत काल रात्री ढगफुटीसदृश्य पाऊस झाला. यामुळे डोंगरगाव पूल इथं कयाधु नदीला पुन्हा पूर येऊन पाणी पिकांमध्ये घुसल्यामुळं शेतकऱ्यांना फटका बसला आहे.

**रत्नागिरी** जिल्ह्यातली अद्याप पाऊस सक्रीय असून आज सकाळी संपलेल्या २४ तासांत चिपळूणमध्ये सर्वाधिक ६७ मिलिमीटर पाऊस पडला. आज सकाळपासून पावसानं थोडी उसंत घेतली असली, तरी वातावरण ढगाळ आहे. आजपर्यंतच्या आकडेवारीनुसार मंडणगड आणि दापोली ते दोन तालुके वगळता इतर सर्व तालुक्यांमध्ये वार्षिक सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

**नाशिक** शहरात काल दुपारपासून जोरदार पाऊस पडत असून आज सकाळी साडेआठ वाजता संपलेल्या १२ तासांत साडे ४१ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे.

माजलगाव धरण पाणलोट क्षेत्रात पडत असलेल्या पावसामुळे धरणाच्या पाणीपताळीत वाढ झाली आहे. त्यामुळे धरणातून सध्या पाच हजार ९१९ दशलक्ष घनफूट प्रतिसेकंद वेगानं पाणी सिंदफणा नदीपात्रात सोडण्यात येत आहे.

**//<><><><>//**